तरुण भारत
Akola Main | 2024-08-14 | Page-8
epaper.tarunbharat.net

## महत्त्वाचे

### मिल्टसिटी हॉस्पिटलतर्फे पालखी मार्गात प्रथमोपचार केंद्र

**खामगाव** : श्री संत गजानन महाराज यांच्या पालखी सोबत हजारो भाविकांनी वारीकरी केली. यावेळी पालखी मार्गावर लाखुड कापड येथे मिल्टसिटी सहित्यसेवासिटी हॉस्पिटलच्या वतीने पालखी सोहळ्यामध्ये सेवार्थ आरोग्य कक्ष व प्रथमोपचार केंद्र उभारण्यात आले होते. सर्व प्रथम श्रींच्या प्रतिमेला वंदन करून शिबिराला सुरुवात करण्यात आली. यावेळी डॉ. अशोक बावसकर, डॉ. पंकज मंत्री, डॉ. प्रशा महाजन, डॉ. नीरज लढ्ढा, डॉ. नितेश टिबडेवाल, डॉ. नीरज गोयनका, डॉ. आनंद राठी व डॉ. अतुल सकलानी यांचा सहभाग राहिला. आरएमओ डॉ. श्रुती काळे, डॉ. ज्योत्स्ना, सिस्टर सुरेखा चव्हाण, वार्डबॉय गोपाल वानखेडकर यांनी सेवा दिली. यावेळी हजारो भाविक भक्तांनी सेवेचा लाभ घेतला. कार्यक्रम व्यवस्थापक नकुल खराबे, सुपरवायझर राजेश बाहेती यांनी परिश्रम घेतले.

### मनोहर नाईक विद्यालयात सायबर सुरक्षेबाबत कार्यशाळा

**अकोला** : महान येथील मनोहर नाईक येथे नुकतीच सायबर सुरक्षेबाबत कार्यशाळा संपन्न झाली. यावेळी अकोला येथील शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयातील सार्थक ठाकरे, सक्षम लोढा या सायबर योद्धांनी ऑनलाईन फसवणूक, तसेच सोशल मीडियाचा वापर त्यामधून होणारी फसवणूक, आपल्या करीत असलेली ऑनलाईन खरेदी, नकलीन मोबाईलमध्ये पैसाचे ॲप, फेसबुक अकाउंट हॅक कसे केले जाते, फेक वेबसाईटस कशा ओळखाव्या या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. ही कार्यशाळा क्विक हिल फाऊंडेशन पुणे आणि महाराष्ट्र सायबर यांच्या सहकार्याने व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जगदीश साबू आणि संगणकशास्त्र विभागाचे डॉ. हरिदास खरात यांच्या मार्गदर्शनात घेण्यात आली. कार्यशाळेचे आयोजन शाळेचे मुख्याध्यापक दीपिका आडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी सर्व शाळेचे विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते.

### तहसीलदार सुनील पाटील रुजू

**खामगाव** : येथील तहसीलचे तहसीलदार म्हणून सुनील पाटील यांनी १२ ऑगस्ट रोजी पदभार स्वीकारला आहे. त्यांनी प्रत्यक्ष कामकाजाला सुरुवात केली आहे. गेल्या आठवड्यात खामगाव तहसीलदार म्हणून कार्यरत असलेले अतुल पाटील यांची तासगाव जि. सांगली येथे तहसीलदार म्हणून बदली झाली. त्यांच्या जागी धाराशिव येथून सुनील पाटील तहसीलदार म्हणून आले आहेत. त्यांनी सोमवारी आपल्या पदाचा पदभार प्रभारी तहसीलदार विजय पाटील यांच्याकडून घेतला आहे.

### महाविकास आघाडीचा कृषी अधिकाऱ्यांना घेराव

**जळगाव जा.** : राज्य शासनाच्या वतीने कापूस, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी ५ हजार अनुदानाची घोषणा करण्यात आली आहे. त्यासाठी पात्र शेतकऱ्यांची यादी ११ ऑगस्ट रोजी घोषित करण्यात आली. परंतु, या अनुदान यादीत बहुतांश गावातील शेतकऱ्यांची नावे वगळण्यात आली आहेत. शेतकरी पात्र असताना सुद्धा त्यांची नावे अनुदान यादीत आलेली नाहीत. तसेच शासनाने पीक विमा व खरीप पीकविमा मंजूर असून सुद्धा अद्याप शेतकऱ्यांना वाटप सुरू झालेले नाही. पंतप्रधान शेतकरी सन्मान योजनेच्या लाभार्थी शेतकऱ्यांना त्रुटी दाखवून डावलले जात आहे. अशा विविध मागण्यांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे नेते प्रसेनजीत पाटील तथा शिवसेना (उबाठा) पक्षाचे जिल्हासंपर्क प्रमुख दत्तात्रय पाटील यांनी १२ ऑगस्ट रोजी पदाधिकारी व शेतकऱ्यांसह जळगाव जामोद कृषी अधिकारी यांना घेराव घालून तसेच विविध मागण्यांसंदर्भात कृषी अधिकारी यांना जाब विचारला. तसेच येत्याच १६ ऑगस्टपर्यंत वरील मागण्यांचा निपटारा न झाल्यास महाविकास आघाडीच्या वतीने आंदोलनाची हाक देण्यात आली. १६ ऑगस्ट रोजीच्या आंदोलनात तालुक्यातील सर्व शेतकरी तथा महाविकास आघाडीच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन दत्तात्रय पाटील यांनी केले. यावेळी एस. डी. सावंत, प्रदीप सपकाळ, महादेव भालतडक, इरफान खान, शेख जावेद, आशिष वायझोडे, पवन वाघ, दत्ता डिक्कर, विठ्ठल पुरी, बी.एम. गावंडे, नितिन राऊत, अनिल पुरी, नितीन ढगेकर यांच्यासह अनेक पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

### शेतातील गोदाम फोडून १० क्विंटल गहू लंपास

**खामगाव** : तालुक्यातील पिंपळगावराजा शिवारातील एका शेतात असलेले गोडाऊन फोडून अज्ञात चोरट्यांनी १० क्विंटल गहू लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. तालुक्यातील कालवडोह येथील शेतकरी दिनकर तुकाराम सरदार (५०) यांनी त्यांच्या पिंपळगावराजा शिवारातील शेतात टिनपत्र्याचे गोडाऊन बांधलेले असून या गोडाऊनमध्ये त्यांनी गहू, ज्वारी असे धान्य ठेवलेले होते. दरम्यान अज्ञात चोरट्यांनी सदर गोडाऊन फोडून त्यातून गव्हाचे १० कट्टे (१० क्विंटल) व एक ज्वारीची बोरडी लंपास केली. ही घटना उघडकीस आल्यानंतर सरदार यांनी पिंपळगावराजा पोलीस स्टेशनला तक्रार दिली आहे. पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

Powered by iDocuments